साक्षी बावडेकर हिचे विद्यापीठ स्तरीय स्पर्धेमध्ये यश

" विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासाबरोबर अभ्यासपूरक उपक्रमाकडे देखील लक्ष देणे गरजेचे असून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अभ्यासपूरक उपक्रम अत्यंत महत्त्वाचे असतात. विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्याने विद्यार्थ्यांचा करिअर बरोबर व्यक्तिमत्व विकास देखील होत असतो." असे प्रतिपादन श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. ते कुमारी साक्षी सुनील बावडेकर या विद्यार्थिनीच्या यशाबद्दल आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना कुमारी साक्षी म्हणाली, " आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात फुले, शाहू , आंबेडकर  यांच्या विचारांचा वारसा जपणे गरजेचे असून मुलांना आपले करिअर घडवण्यासाठी हे विचार आपल्यामध्ये रुजवणे महत्त्वाचे आहे. आज-काल माहिती तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांचा अधिक वेळ हा विविध प्रकारच्या सोशल मीडिया वर व्यतीत होत आहे. पण या तरुण पिढीने त्याबरोबरच फुले, शाहू , आंबेडकर यांच्या विचारांच्या पुस्तकांचे वाचन तसेच संगणकावरून त्यांच्या कार्याची माहिती घेतल्यास ती त्यांचे करिअर घडवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल." भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 132 व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने फुले, शाहू, आंबेडकर सप्ताह अंतर्गत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. श्री व्यंकटेश महाविद्यालय,इचलकरंजी मधून कुमारी साक्षी सुनील बावडेकर या विद्यार्थिनींनी पदवी स्तर संघामध्ये सहभाग घेतला व द्वितीय क्रमांक प्राप्त केला. यामध्ये तिने " फुले, शाहू, आंबेडकर आणि स्त्री पुरुष समानता " या विषयावर  आपले मत मांडले. हे यश प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयांमध्ये तिच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

